# बिट्स पिलानीमध्ये 'ड्रग डिस्कवरी'वर परिषद

## गोवा कॅम्पस आणि स्क्रॉडिंगर यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी
वास्को

बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पस आणि स्क्रॉडिंगर यांच्या संयुक्त विद्यमाने ड्रग डिस्कवरीवरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन बिट्स पिलानी के.के.बिर्ला गोवा कॅम्पसच्या सभागृहात नुकतेच करण्यात आले. या परिषदेत जवळपास एक हजार तीनशे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

या परिषदेचे उद्घाटन खास समारंभात करण्यात आले. याप्रसंगी स्क्रॉडिंगरचे अध्यक्ष डॉ. कॅरेन अकिनसन्या, उपाध्यक्ष डॉ. रघु रंगस्वामी, बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू व समन्वयक डॉ. सुमीत विश्वास उपस्थित होते.




**सांकवाळ : बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पस आणि स्क्रॉडिंगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना डॉ. कॅरेन अकिनसन्या व्यासपीठावर डॉ. रघू रंगस्वामी, प्रा. सुमन कुंडू व डॉ. सुमीत विश्वास.**

या परिषदेत ग्लेनमार्क, गिलियाड, एली लिली, सिंजीन, ज्युबिलंट, ऑरिजीन, अरगेन, सन फार्मा आदी फार्मास्युटिकल कंपन्याचे मुख्य शास्त्रज्ञ तसेच एनसीबीएस, एनसीएल, इनस्टेम, आयआयएससी, इमटेक, बोस इन्स्टिट्यूट, बिट्स (पिलानी व हैद्राबाद कॅम्पस) आदी आघाडीच्या संस्था सहभागी झाल्या आहेत. या परिषेदत दोन दिवसांमध्ये ७०० पोस्टर्स सादर करण्यात आले.

या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या पॅनेल सदस्यांमध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, सेंट्रल ड्रग्ज रिसर्च इन्स्टिट्यूट, नॉर्थ ईस्ट इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटीग्रेटीव्ह मेडिसिन व औषध संशोधनात गुंतलेल्या संस्थामधील अनेक प्रमुख शास्त्रज्ञांचा समावेश होता.